## आदेश निशाणी क्र. ५५

(दिनांक २२ जून २०२६ रोजी पारीत)

०१. वादींनी सदरच्या अर्जाद्वारे दावा खारीज करण्याचा आदेश रद्दबातल करून त्यांना पुढील कार्यवाही करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी त्यांनी मागणी केलेली आहे.

०२. वादींनुसार, दिनांक १६/०२/२०२६ रोजी प्रतिवादी क्र. २ मयत झाल्याने आणि त्या सदर्भाने योग्य ती उपाययोजना केली नाही म्हणून दावा खारीज करण्याचा आदेश झालेला आहे; परंतु त्यांच्यानुसार, त्यांनी वादी क्र. २ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी सदरच्या अर्जासोबत अर्ज दिलेला आहे. तेव्हा दावा खारीज करण्याचा आदेश रद्दबातल करून त्यांना पुढील उपाययोजना करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादींनी सदरच्या अर्जाला विरोध करताना वादीं जाणीवपूर्वक आणि विनाकारण प्रकरणामध्ये विलंब करीत आहेत आणि त्याचमुळे त्यांनी मयत वादीच्या वारसांना अभिलेखावर घेण्यासंदर्भाने उपाययोजना केली नव्हती, तेव्हा त्यांनी अर्ज नामंजूर करावा किंवा मंजूर करावयाचे झाल्यास सदर वादींवर रक्कम रुपये १,०००/— परीव्यय लादावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०४. वादींच्या वतीने वकील श्री. जी. पी. लावंड यांना ऐकले तर प्रतिवादींच्या वतीने वकील श्री. व्ही. डी. पवार यांना ऐकले.

०५. सदर प्रकरणामध्ये दिनांक १६/०२/२०२६ रोजीच्या

आदेशाप्रमाणे दावा खारीज करण्यासाठी ठेवलेला आहे. आदेशाचे अवलोकन केले असता, दिनांक १८/०५/२०२५ रोजी वादी क्र. २ हा मयत झालेला आहे आणि त्याच्या वारसांना अभिलेखावर घेण्यात उर्वरीत वादींनी स्वारस्य दाखविलेले नाही म्हणून त्यांचा दावा बंद करण्यात आलेला आहे. शिवाय उप अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्यानुसार, वादींनी दस्ताऐवज पुरविलेले नाहीत म्हणून त्यांना मोजणी पूर्ण करता आलेली नाही. या पार्श्वभूमीवर सदर दावा खारीज करण्यासाठी ठेवण्यात आलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता मोजणीची कागदपत्रे अभिलेखावर दाखल झालेली आहेत, याचाच अर्थ मोजणी पूर्ण झालेली आहे. एवढेच नाही तर वादींनी मयत वादी क्र. २ चे वारसांना अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज दिलेला आहे, ज्या पार्श्वभूमीवर, वादी प्रकरणात पुढे जाण्यासाठी स्वारस्य दाखविलेले दिसून येत असल्याने दावा खारीज करणे उचित होणार नाही; परंतु वादीची दिरंगाई देखील ठसठसीतपणे पुढे येते. वादी क्र. १ ने वादी क्र. २ हा त्याचा भाऊ असताना तो दिनांक ११/०५/२०२५ रोजी मयत झाल्यानंतर तात्काळ त्याच्या वारसांना अभिलेखावर घेणे अपेक्षीत होते; परंतु एक वर्ष उलटुनही त्याने तसे केले नव्हते. त्यामुळे सदरचा कालावधी अकारण वाया गेलेला आहे. शिवाय मोजणीच्या कार्यवाहीमध्ये देखील वादीने दिरंगाई केलेली आहे.

०६. उपरोक्त काहीही असले तरी आता वादी हा प्रकरणामध्ये स्वारस्य दर्शवित असल्याने दावा खारीज करणे उचीत होणार नाही; परंतु वादीने ज्या पद्धतीने वादी क्र. २ च्या वारसांना अभिलेखावर आणण्यासाठी दिरंगाई केलेली आहे आणि त्यामुळे ना केवळ सार्वजनीक श्रम आणि वेळ वाया गेलेला आहे तर त्यामुळे

सार्वजीनक खर्च देखील वाढलेला आहे. पक्षकारांनी हे लक्ष्यात ठेवणे आवश्यक आहे की, त्यांच्या दिरंगाईच्या कृतीमुळे शासनाला स्वस्त न्याय्य देण्यासाठी करदात्याच्या उत्पन्नातून मोठा खर्च करावा लागतो; तेव्हा त्यांनी प्रत्येक कृती ही वेळेवर आणि योग्य टप्यावर करावी, असे अपेक्षीत आहे आणि जे पक्षकार तसे करणार नाहीत, ते शासनाच्या लाभास पात्र ठरत नाहीत. हातातील प्रकरणात वादीची दिरंगाई त्याला लाभास पात्र ठरवित नाही, म्हणून तो अधिकचा होणारा खर्च भरपाई करण्यास उत्तरदाईत्व ठरतो. यामुळे ना केवळ विरुद्ध पक्षकारांना भरपाई मिळेल तर शासनाचा अधिकचा होणारा खर्च देखील भरून निघेल, तद्‌वतच वादींना अशा प्रकारची दिरंगाईमुळे त्यांना आर्थिक भुरदंड होवू शकतो, याचा धडाही मिळेल. तेव्हा अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये ७००/— परीव्यय लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. परीव्यय रकमेपैकी रुपये ४००/— वादीने प्रकरणास तोंड देणा—या प्रतिवादींना पुढील तारखेपर्यंत भरपाई म्हणून हस्ते द्‌यावी, किंवा देण्यासाठी न्यायालयात जमा केल्यावरून आणि आणि उर्वरीत रक्कम शासन जमा केल्यावरून दावा खारीज करण्याचा केलेला आदेश रद्‌दबातल ठरवून त्यांना पुढील उपाययोजना करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे;

३. परीव्यय हा वादी अर्जदारावर राहील.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.06.22 17:37:26 +0530

दिनांक: २२.०६.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | N. V. Koli<br>Stenographer Grade II |
| Name of Court | : | Civil Judge Senior Division Bhoom, Tq. Bhoom, Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 22.06.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 22.06.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 22.06.2026 |